NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020
YEAR : 45) 15 th October 2020 ( No. of Pages 08 ) ( No : 10

# नेट-सेट मुक्त शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ लागू करणे

- प्रा.बी.टी.देशमुख
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**"नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांबाबत सवलतींचा घाट?" "याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित; तरीही नियमित करण्याच्या हालचाली"** असा मथळा व उपमथळा देऊन बुधवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२० रोजीच्या दैनिक लोकसत्तामध्ये "विविधा" पृष्ठ ४ वर एक वृत्त प्रकाशित करण्यात आलेले आहे. या वृत्ताची सुरूवातच पुढीलप्रमाणे आहेः-

"मुंबई : प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक पात्रता परीक्षा (नेट-सेट) उत्तीर्ण न होता सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्या नेमणुका नियमित करण्याचा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रविष्ट असतानाही मंत्रालयात मात्र या प्राध्यापकांच्या सेवा त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून नियमित करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी याबाबत नुकतीच आमदारांची बैठक घेतली." या वृत्तात पुढे असेही नमूद आहे की, "नेट-सेट नसतानाही सेवेत असलेल्या प्राध्यापकांच्या मान्यतेचा वाद दोन दशके राज्यात सुरू आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. असे असले तरी आता शासनाने या प्राध्यापकांची सेवा नियुक्ती दिनांकापासून मान्य करून त्यांना लाभ देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. याबाबत उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांनी गेल्या पंधरा दिवसांत आमदारांच्या दोन बैठका घेतल्या."

**"त्याचा हजारो कोटी रुपयांचा भार शासनाच्या तिजोरीवर पडणार आहे, अशी माहिती उच्च शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने दिली."** "पुढील दोन महिन्यांत शिक्षक आणि पदवीधरांसाठी राखीव जागांच्या तीन मतदारसंघातील निवडणुका येऊ घातल्या आहेत. या निवडणुकीसाठी हा आटापिटा असल्याचीही चर्चा आहे." असे चुटकुलेही या वृत्तामध्ये समाविष्ट आहेत.

**याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबर २०१३ रोजी "सहा वर्षे सेवा झालेल्या प्रत्येक नेट-सेट मुक्त शिक्षकाला आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात यावेत" असे अंतरिम आदेश पारित केले.** मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा अंतरिम आदेश होण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेले होते. त्यातील कोणताही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला नाही. उलट त्या सातही निर्णयांना सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे संरक्षण प्राप्त झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर आधारित ३१ निर्णय या शिक्षकांच्या बाजूने दिले. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्णयांची संख्या ३८ झाली.

**दिनांक २५ मार्च २०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने ही सर्व प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाकडे सुनावणीसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेत असतांना १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा आपला अंतरिम आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला.** इतकेच नव्हेतर अशा अंतरिम आदेशामुळे अनेक अधिव्याख्यात्यांना यापूर्वी लाभ मिळालेले आहेत. तत्सम लाभ न मिळाल्यामुळे विपरितरीत्या प्रभावित झालेल्या तत्सम शिक्षकांना मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर जाऊन अंतरिम आदेश मिळविण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाने मोकळा करून दिला. त्याप्रमाणे २५ मार्च २०१५ नंतर निरनिराळ्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी आठ निर्णय दिलेत. **अशारितीने या शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठांच्या निर्णयांची संख्या ४६ झाली. या ४६ पैकी एकही निर्णय सर्वोच्च न्यायालयामध्ये रद्दबातल झालेला नाही. मात्र त्या ४६ निर्णयांना सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे संरक्षण मिळालेले आहे.**

**मा. मुंबई उच्च न्यायालयाचा दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजीचा निर्णय हा एकमेव निर्णय असा आहे की, जो या शिक्षकांच्या विरोधात गेलेला आहे. हा एकमेव निर्णय अजिवंत निर्णय आहे.** याचा अर्थ असा आहे की, निर्णय झाल्याच्या क्षणापासून त्या निर्णयानेच त्या निर्णयाची अंमलबजावणी स्थगित केलेली आहे व ही स्थगिती फक्त सर्वोच्च न्यायालयच उठवू शकेल असेही नमूद केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आजतागायत ती स्थगिती उठवलेली नाही. **मा. सर्वोच्च न्यायालयाने आपला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश आजपावेतो दुरूस्त केला नाही, मागे घेतलेला नाही किंवा रद्द केलेला नाही.**

नेट-सेट मुक्त शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे (CAS) लाभ प्रदान करण्याच्या संदर्भात काही विधानमंडळ सदस्यांनी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांची दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी भेट घेऊन या नेट-सेट मुक्त शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे (CAS) लाभ प्रदान करण्याविषयी विनंती केली असून मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी याबाबतीत सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याच्या बातम्या मोठ्या प्रमाणात समाजमाध्यमांवर व अन्यत्र प्रसारित झालेल्या आहेत. गेले अनेक दिवस प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडविण्यासाठी मा. विधानमंडळ सदस्यांनी व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी हा जो पुढाकार घेतलेला आहे, त्यामुळे न्यायालयाच्या अवमान प्रकरणातून उच्च शिक्षण विभागाची मान मोकळी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, ही बाब निश्चितच स्वागतार्ह म्हटली पाहिजे. याबाबतीत निर्णय घेत असतांना निश्चित काही मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहे.

### *मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश होण्यापूर्वीचे मा. उच्च न्यायालयाचे निर्णय*

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचे अंतरिम आदेश होण्यापूर्वी मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने सात अनुकूल निर्णय (*P106NB2014*) दिल्याचे दिसून येते. सुरुवातीला याचिका क्रमांक त्यानंतर खंडपीठाचे तपशील व त्यानंतर निर्णयाचा दिनांक या सात निर्णयांच्या बाबतीत पुढीलप्रमाणेः-

**(1) W.P. No. (L) 1326 of 2012 :-** In the High Court of

Judicature at Bombay. Date of Judgment : **10 May 2013.**

**(2) W.P. No. 11477 of 2010 :-** In the High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad. Date of Judgment : **1st August, 2013 .**

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad. Date of Judgment : **28th August 2013.**

**(4) W.P. No. 4994 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad. Date of Judgment : **13th September 2013.**

**(5) W.P.No.6659 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad. Date of Judgment : **10th October, 2013.**

**(6) W.P. No. 3122 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **September 26, 2013.**

**(7) W.P. No. 10149 of 2010 :-** In the High Court of Judicature at Bombay,Bench at Aurangabad. Date of Judgment : **October 17, 2013.**

यातील पहिल्या निर्णयामुळे १५ दिवसांच्या आत या संदर्भातील शासननिर्णय निर्गमित करण्याचे बंधन शासनावर पडले. इतर सहाही निर्णयांनी CAS साठी सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरावी लागेल असे आदेशित केलेले आहे.

**३ .** या निरनिराळ्या सात निर्णयांमध्ये सातच याचिका आहेत असे नव्हे, तर त्यातील अनेक निर्णयात अनेक याचिका समाविष्ट आहेत व शेकडो शिक्षक त्यामध्ये वादी म्हणून न्यायालयात दाखल झालेले आहेत. या सातही निर्णयांचे काळजीपूर्वक वाचन केले तर असे आढळून येते की, या प्रत्येक न्यायालयीन निर्णयाने अनेक विसंगती चव्हाट्यावर आणलेल्या आहेत. या विविध निर्णयात समाविष्ट असलेले मा.उच्च न्यायालयाचे काही महत्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे :-

(1) “The stand taken by the State is wholly unjust and deserves to be rejected.”- (Judgement dated 1st August 2013.)

(2) “In this situation, the tag of their being adhoc teachers, does not and cannot constitute a ground to deny them the benefit of Career Advancement Scheme, even on Governments own showing, and Annexures ‘B’ and ‘C’, referred to hereinbefore.”- (Judgement dated 1st August 2013.)

(3) “It is also not in dispute that the UGC has resolved to grant exemption to the teachers who were appointed during 1991 to 2000 and has also stated that “Therefore, the services of such teachers, for all purpose, should be counted from the date of their regular appointment - Vide communication of UGC dated 26.08.2011.” - (Judgement dated 28th August 2013.)

(4) “It is nobodys case that the petitioners are not otherwise qualified or their appointments have not been approved by the University or they do not possess requisite qualifications except NET/SET” - (Judgement dated 28th August 2013.)

(5) “The factual position indisputably shows that all the petitioners have been continuously and uninterruptedly working since the dates of their initial appointment which are during 1991 to 2000 and that their services have been permanently approved by the University. It is also an undisputed fact that UGC has exempted the candidates who were appointed during the period from 1991 to 2000, from acquiring NET/SET qualifications.” - (Judgement dated 28th August 2013.)

(6) “keeping away the petitioners cases from being considered for the benefit of exemption with reference to the directions of the HRD Ministry would give rise to invidious discrimination among similarly situated persons under the capricious decisions leaving the petitioners in lurch.”- (Judgement dated 17th October 2013.)

(7) “The Joint Director filed a written statement and contended that approval has been granted to the appointment of the petitioners husband on probation by the University subject to condition of the petitioners husband passing NET/SET examination.” “Therefore, the contention raised in the communication dated 20th June 2011 that the appointment of the petitioner’s husband appears to be on adhoc basis is baseless.” - (Judgement dated 26th September 2013.)

(8) **“It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC”-** (Judgement dated 17th October 2013.)

### *उत्तम संरक्षण देणारा मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश*

**४ . आश्वासित प्रगती योजनेच्या बाबतीत प्रत्येक शिक्षकाची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे ४६ निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेत, त्यातील कोणताही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात रद्दबातल झाला नाही. उलट मा. सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षकांना न्याय देणारा व मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयांना संरक्षण देणारा अंतरिम आदेश पारित केला.** दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी, सन २०१३ च्या राज्यशासनाच्या विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) क्रमांक ३४११८ वर, मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेला हा अंतरिम आदेश पुढील प्रमाणे :-

“We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be **entitled to the benefits of career advancement scheme only for the purpose of pay-scales.** According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice.”

विशेष अनुमती याचिका खुद्द शासनानेच दाखल केली होती. त्या याचिकेच्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने त्या बाबतीत दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी अंतरीम आदेश दिला. तो आदेश वर नमूद केलेला आहे. **मा.सर्वोच्च न्यायालयाचा १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश आजपर्यंत त्या न्यायालयाने दुरूस्त केलेला नाही किंवा मागे घेतला नाही किंवा रद्द केलेला नाही.** आजही तो अस्तित्वात आहे.

***आश्वासित प्रगती योजनेच्या बाबतीत प्रत्येक शिक्षकाची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे जे ४६ निर्णय मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेत, त्यातील कोणताही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयात रद्दबातल झाला नाही. उलट मा. सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षकांना न्याय देणारा व मा. उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयांना संरक्षण देणारा अंतरिम आदेश पारित केला.***

*(लेखाचा परिच्छेद ४ पहा)*

### *मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानंतर मा. उच्च न्यायालयाचे ३१ निर्णय*

५. एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश (Interim order) झाल्यानंतरच्या काळात मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांचे जेवढे निर्णय झाले ते सारे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित आहेत. न्यायालयीन कामकाजाची कायदे व नियमांनी लाऊन दिलेली जी शिस्त आहे, त्या शिस्तीप्रमाणे एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश किंवा अंतरिम आदेश निर्गमित झाला की कोणतेही उच्च न्यायालय त्या निर्णयापेक्षा वेगळा किंवा विरोधात निर्णय देऊ शकत नाही. हे सारे निर्णय या शिक्षकांच्या बाजूचे आहेत. अशा निर्णयांची संख्या एकतीस आहे. **या सर्व ३१ निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश उधृत केला असून त्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेले आहेत.** पहिल्या दिवसापासून या शिक्षकांची सेवा धरून त्यांना पदोन्नतीचे लाभ देण्यात यावे असे सात निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापूर्वी झालेले आहेत. **अशारितीने या निर्णयांची एकूण संख्या ३८ होते.** हे एकतीस निर्णय कोणत्या मा. खंडपीठाने दिलेले आहेत, कोणत्या प्रकरणात दिलेले आहेत व कोणत्या तारखेला दिलेले आहेत याची माहिती पुढीप्रमाणे :-

**(8) W.P. No. 8316 of 2013 :-** In the High Court Of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **12th December, 2013.**

**(9) W.P. No. 4962 of 2012 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **19th December, 2013.**

**(10) W.P. No. 5073 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur Date of Judgment : **January 23, 2014.**

**(11) W.P. No. 6473 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur Date of Judgment : **30.1.2014.**

**(12) W.P. No. 7421 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **21st January, 2014.**

**(13) W.P. No. 10383 of 2013 :-** In the High Court of Judicature At Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **January 13th, 2014.**

**(14) W.P. No. 1129 of 2014 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **21st February, 2014.**

**(15) W.P. No. 8316 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment :12th December, 2013.

**(16) W.P. No. 6325 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur Date of Judgment : 5th March 2014. ***(P107NB14)***

**(17) W.P. No. 5224 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad Date of Judgment : **September 26, 2013.**

**(18) W.P. No.11392 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **September 24, 2014.**

**(19) W. P. No. 2216 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench : Nagpur Date of Judgment : **November 07, 2014.**

**(20) W. P. No. 1534 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad Date of Judgment : **May 07, 2014.**

**(21) W. P. No. 3448 of 2014 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **April 11, 2014.**

**(22) W.P. No. 2236 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **January 07, 2015.**

**(23) W.P. No. 5261 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **January 19, 2015.**

**(24) W.P. No. 9619 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **14th January, 2015.**

**(25) W.P. No. 2632 of 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment :**14th January, 2015.**

**(26) W.P. No.1371 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment :**10th February, 2015. *(P26NB15)***

**(27) W. P. No. 2823 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment :**13th October 2014.**

**(28) W. P. No. 809 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **28 January 2015.**

**(29) W. P. No. 1371 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **10th February, 2015.**

**(30) W. P. No. 5063 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench : Nagpur. Date of Judgment : **February 12, 2015.**

**(31) W. P. No.9687 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **24th February, 2015.**

**(32) W. P. No. 1987 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **25th February, 2015.**

**(33) W. P. No. 3531 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **4th March, 2015.**

**(34) W. P. No. 383 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **9th March, 2015.**

**(35) W. P. No. 2837 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay : Nagpur Bench : Nagpur. Date of Judgment : **13th March, 2015. *(P46NB15)***

**(36) W. P. No. 5014 of 2015 :-** In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad Date of Judgment : **30th April, 2015.**

**(37) W. P. No. 3352 of 2014 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **May 06, 2014.**

**(38) W. P. No. 3115 of 2015 :-** In the High Court of Judicature At Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **April 06, 2015. *(P92NB15)***

६. घटनेतील तरतुदी लक्षात घेता न्यायालयीन अवमानाचे प्रकरण शासनात अत्यंत गांभिर्याने पाहिले जाते. मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांनी याबाबतीत स्थायी आदेश निर्गमित केलेले आहेत. **थेट कक्ष अधिकाऱ्यांच्या स्तरावरील किंवा**

***मा. सर्वोच्च न्यायालयाने आपला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश आजपावेतो, दुरूस्त केलेला नाही, मागे घेतलेला नाही किंवा रद्द केलेला नाही.***

*(लेखाचा परिच्छेद ११ पहा)*

***या शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असे निर्णय मा.उच्च न्यायालयाने ९ याचिकामध्ये दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात ते निर्णय कायम करण्यात आल्यानंतर त्याची इमानेइतबारे अंमलबजावणी करणे हे राज्यकर्त्यांचे घटनात्मक कर्तव्य आहे. घटनात्मक तरतुदींचे आपण पालन करू अशी शपथ घेतल्यानंतरच मा. उच्च शिक्षणमंत्री त्यांच्या खुर्चीवर बसलेले आहेत. याची वेगळी आठवण करून देण्याची गरज पडू नये असे अपेक्षित आहे.***

*(लेखाचा परिच्छेद २७ पहा)*

**इकडे उच्च शिक्षण विभागात सहसंचालकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना परस्पर थेट न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे घटनेतील तरतुदी हे होय.** सर्वोच्च न्यायालयाच्या आधारावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी अनेक अवमान याचिका दाखल करण्यात आल्या. **निरनिराळ्या सहसंचालकांनी त्या वेळेला जी कारवाई केली ती सर्व प्रकरणे याठिकाणी नमूद करणे शक्य नाही. संघटनेने न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेसोबत ती सर्व प्रकरणे जोडलेली आहेत.** नमूना म्हणून एखादे उदाहरण सादर करता येईल. सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५०७३ मध्ये ज्या १९ नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाजूने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारावर मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला होता. त्याबाबत अवमान याचिकासुद्धा दाखल झाली होती. तेव्हा सहसंचालकांनी **त्या सर्वांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमचे सर्व लाभ अदा करण्याची कारवाई पूर्ण केली.** दिनांक १५ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, :-

"उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने दिनांक २३.०१.२०१४ च्या आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेश दिनांक १८.११.२०१३ च्या अनुषंगाने इंटेरिम आदेश दिलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १८.११.२०१३ व दि. २७.११.२०१३ च्या निर्णयाच्या अधिन राहून **वेतननिश्चिती करण्यात आली आहे.**" *(P28NB2015)*

अमरावती विभागाच्या सहसंचालकांच्या या १५ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशान्वये करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमचे सर्व लाभ देऊन या १९ नेट-सेट मुक्त शिक्षकांची वेतननिश्चिती करण्यात आली. इतरही विभागाच्या सहसंचालकांनी शेकडो शिक्षकांची वेतनश्रेणी सुधारित करून दिली व त्याप्रमाणे त्यांना आजही वेतन मिळत आहेत. **त्यापैकी जे लोक निवृत्त झालेत त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेच्या लाभासह उच्च वेतनावर आधारित जुन्या सेवानिवृत्तीच्या वेतन लाभाचे निर्धारण करण्यात आले व त्याप्रमाणे त्यांना सेवानिवृत्ती किंवा कुटूंबनिवृत्ती वेतन आजही मिळत आहे.**

### *अंतरिम आदेश मिळविणारांनाच वंचित ठेवण्याचा प्रयत्न याचिकाकर्त्यांनी हाणून पाडला*

७. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी अंतरिम आदेश पारित केले होते, त्या आधारावर मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी निर्णय दिलेत. अवमान याचिका दाखल झाल्यावर त्या निर्णयानुसार अनेक सहसंचालकांनी शेकडो शिक्षकांना पदोन्नतीचे लाभ प्रत्यक्षात अदा केले. त्यातील एक प्रकरण उदाहरण म्हणून वर नमूद केलेले आहे. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे **औरंगाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या ज्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश पारित केले होते, त्या याचिकेतील शिक्षकांना मात्र पदोन्नतीचे लाभ औरंगाबादच्या सहसंचालकांनी लागू केले नव्हते. या शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयात पुन्हा दाद मागावी लागली. तेव्हा हे लाभ मिळाले.** त्यांनी केलेल्या अर्जावर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ सप्टेंबर २०१५ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :- "Prima facie, the Respondents have disregarded the directions, which may border on Contempt of Court." *(P139NB2015)* मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर या सर्व शिक्षकांना पदोन्नतीचे लाभ देण्यात आले.

### *रिकव्हऱ्या काढण्याचे प्रयत्न मा. उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविले*

८. महाराष्ट्रामध्ये सन १९९१ ते २००० या काळात विधिवतरित्या सेवेत आलेल्या नेट-सेट मुक्त **शेकडो शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ प्राप्त झालेले होते. काही वर्षानंतर त्यांच्याकडून ते लाभ रिकव्हरीच्या माध्यमातून परत घेण्याचे संचालक व सहसंचालक यांच्या कार्यालयानी केलेले प्रयत्न न्यायालयाने रद्दबातल ठरविले.** अशारितीने रिकव्हरी काढण्याचे प्रयत्न रद्दबातल ठरविणारे अनेक निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिले असले तरी उदाहरण म्हणून संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सहा *(P60NB2015)* निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत :-

**(1) W.P. No. 1893 of 2010 :-** In the High Court of Judicature at Bombay Date of Judgment : **3rd September, 2010.**

**(2) W.P. No. 1991 of 2011 :-** In the High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **28th March, 2011.**

**(3) W.P. No. 5271 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **28th August 2013.**

**(4) W.P. No. 4994 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **13th September 2013.**

**(5) W.P. No. 5224 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **26th September, 2013.**

**(6) W.P. No. 6659 of 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Date of Judgment : **10th October, 2013.**

**उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी संचालक व सहसंचालकांचे हे प्रयत्न रद्दबादल ठरविल्यानंतर त्यातील एकाही प्रकरणात पुन्हा रिकव्हरी काढण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही किंवा अधिकाऱ्यांना त्यांच्या अशा प्रयत्नात यश मिळाले नाही.**

### *अंतरिम आदेशाने लाभान्वित झालेल्या व्यक्तींशी तत्सम व्यक्तींना उच्च न्यायालयातून आदेश घेण्याची मुभा*

९. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २५ मार्च २०१५ रोजी एक महत्त्वपूर्ण आदेश पारित करून नेट-सेट मुक्त शिक्षकांची सर्व प्रकरणे मा. मुंबई उच्च न्यायालयाकडे सुनावणीसाठी पाठविण्याचे ठरविले. *(P41NB2015)* मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या २५ मार्च २०१५ च्या आदेशाने १८ नोव्हेंबर २०१३ चा अंतरिम आदेश कायम ठेवला असून काही अधिव्याख्यात्यांना किंवा सहाय्यक प्राध्यापकांना यापूर्वीच लाभ मिळालेले आहेत, तत्सम लाभ न मिळाल्यामुळे विपरितरित्या प्रभावित झालेल्या तत्सम व्यक्तींना मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या

***मा. मुंबई उच्च न्यायालयाचा या शिक्षकांच्या विरोधात गेलेला एकमेव अजिवंत (स्वयंस्थगित) निर्णय म्हणजे दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजीचा निर्णय होय.***

*(लेखाचा परिच्छेद १२ व १३ पहा)*

खंडपीठापुढे जाऊन अंतरिम आदेश (Interim Order) मिळविण्याची मोकळीक सुद्धा मा. सर्वोच्च न्यायालयाने दिली. २५ मार्च २०१५ च्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये हे नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "Liberty is also granted to affected persons to seek in the High Court of Judicature at Bombay ad interim orders which may place them on parity with other Lecturers/Assistant Professors similarly placed." *(P41NB2015)*

### *मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ नोव्हेंबर २०१३ च्या अंतरिम आदेशानुसार मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी २५ मार्च २०१५ नंतर दिलेले निर्णय*

**१०.** २५ मार्च २०१५ चे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश पारित झाल्यानंतर **मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ नोव्हेंबर २०१३ च्या अंतरिम आदेशाला धरून** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी निरनिराळे आठ निर्णय पारित केलेत. यापैकी सात निर्णय मा. नागपूर खंडपीठाचे असून एक निर्णय मा. औरंगाबाद खंडपीठाचा आहे. अशारितीने २५ मार्च २०१५ नंतरच्या काळात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेले हे आठ निर्णय पुढीलप्रमाणे :-

**(39) W.P. No. 3535 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur. Date of Judgment : **April 1, 2015.**

**(40) W.P.No. 3115 of 2015 :** In the High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad. Date of Judgment : **April 06, 2015.**

**(41) W. P. No. 2981 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **10th April, 2015.**

**(42) W. P. No. 2982 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **10th April, 2015.**

**(43) W. P. No. 2983 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **10th April, 2015.**

**(44) W.P.No. 2984 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **10th April, 2015.**

**(45) W. P. No. 2977 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur. Date of Judgment : **April 16, 2015.**

**(46) W. P. No. 5378 of 2014 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur. Date of Judgment : **April 16, 2015.** *(P66NB2015)*

**११.** आश्वासित प्रगती योजनेचे लाभ या शिक्षकांना प्रदान करणाऱ्या मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या निर्णयांची एकूण संख्या ४६ झालेली आहे. **मा. उच्च न्यायालयाच्या या ४६ निर्णयांपैकी एकही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेला नाही. उलट अंतरिम आदेशाने या निर्णयांना संरक्षण दिले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने आपला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश आजपावेतो, दुरूस्त केलेला नाही, मागे घेतलेला नाही किंवा रद्द केलेला नाही.** संघटनेच्या दप्तरी प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या निर्णयांची ही संख्या आहे. अनेक निर्णय उपलब्ध झालेले नाही ते वेगळे. शिवाय या ४६ पैकी अनेक निर्णयांमध्ये अनेक याचिका समाविष्ट आहेत व त्यात अनेक याचिकाकर्ते समाविष्ट आहेत. **दुर्दैवाची गोष्ट अशी की, यातील काही निर्णयांच्या बाबतीत प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली पण अनेक निर्णयांच्या बाबतीत अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.**

अशा स्थितीत "याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित तरीही नियमित करण्याच्या हालचाली" अशा निरर्थक मथळ्याच्या ऐवजी गुणवंत शिक्षकांनी प्रसृत केलेल्या वार्तापत्राला "१८ नोव्हेंबर २०१३ च्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाची अजूनही अंमलबजावणी प्रलंबित" असा मथळा जास्त शोभून दिसला असता.

### *या शिक्षकांच्या विरोधात गेलेला मा. मुंबई उच्च न्यायालयाचा एकमेव अजिवंत निर्णय*

**१२.** मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांचे ४६ निर्णय या शिक्षकांच्या बाजूने आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश या शिक्षकांच्या बाजूने आहे. हे खरे असले तरी **मा. मुंबई उच्च न्यायालयाचा या शिक्षकांच्या विरोधात गेलेला एकमेव अजिवंत (स्वयंस्थगित) निर्णय म्हणजे दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजीचा निर्णय होय.** हे समजून घेण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयातील परिच्छेद ८८ लक्षात घ्यावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षकांना लाभ देणारे अंतरिम आदेश पारित केलेले आहेत, ते आपण रद्द करू शकत नाही, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या आधारावर उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी या शिक्षकांना लाभ देणारे अंतरिम आदेश पारित केले होते, तेही आपण रद्द करू शकत नाही, याची जाणीव असल्यामुळे **२३ डिसेंबर २०१५ चा निर्णय देणाऱ्या मा. खंडपीठाने आपल्याच निर्णयाला अजिवंत ठेवले आहे, म्हणजेच स्वयंस्थगिती दिलेली आहे व त्या निर्णयाला मा.सर्वोच्च न्यायालयच स्थगनावस्थेतून बाहेर काढू शकेल असेही नमूद केले आहे. आजपर्यंत मा.सर्वोच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१५ च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगनावस्थेतून बाहेर काढलेले नाही. त्यामुळे तो निर्णय स्वयंस्थगनावस्थेतच आहे. म्हणजे अजिवंत आहे.**

**१३.** दिनांक २३ डिसेंबर २०१५ च्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद ८८ मधील स्वयंस्थगनादेश समाविष्ट असलेला मजकूर मी पुढे शब्दशः उधृत करीत आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"However, in view of the fact that the matters are pending in Supreme Court and as we have decided these matters based upon the orders passed by the Supreme Court, pending the Appeals and the Special Leave Petitions, we are inclined to observe that **this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.** The Respondents/parties, if required, to take any steps based upon this judgment, shall be after further order of the Supreme Court."

**(A)** मा.सर्वोच्च न्यायालय यथोचित आदेश पारित करीत नाही, तोपर्यंत अंतरिम आदेश निरस्त करण्यासाठी आमच्या या निर्णयाचा कोणालाही वापर करता येणार नाही. (this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.)

**(B)** राज्यशासनाला (Respondents) किंवा इतर कोणत्याही पक्षकाराला (Parties) आमच्या या निर्णयाच्या आधारावर कोणतीही कारवाई करता येणार नाही किंवा आदेश (Any Steps) काढता येणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाकडून

***२३ डिसेंबर २०१५ चा निर्णय देणाऱ्या मा. खंडपीठाने आपल्याच निर्णयाला अजिवंत ठेवले आहे, म्हणजेच स्वयंस्थगिती दिलेली आहे व त्या निर्णयाला मा.सर्वोच्च न्यायालयच स्थगनावस्थेतून बाहेर काढू शकेल असेही नमूद केले आहे. आजपर्यंत मा.सर्वोच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१५ च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगनावस्थेतून बाहेर काढलेले नाही. त्यामुळे तो निर्णय स्वयंस्थगनावस्थेतच आहे. म्हणजे अजिवंत आहे.***

*(लेखाचा परिच्छेद १२ व १३ पहा)*

***शेकडो शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ प्राप्त झालेले होते. काही वर्षानंतर त्यांच्याकडून ते लाभ रिकव्हरीच्या माध्यमातून परत घेण्याचे संचालक व सहसंचालक यांच्या कार्यालयानी केलेले प्रयत्न न्यायालयाने रद्दबातल ठरविले.***

*(लेखाचा परिच्छेद ८ पहा)*

आदेश घेतल्यानंतरच अशा Steps घेता येतील. (The Respondents/parties, if required, to take any steps based upon this judgment, shall be after further order of the Supreme Court.) या निर्णयाच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश पारित केलेले नसल्यामुळे डिसेंबर २०१५ चा मा.मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आजही स्वयंस्थगनावस्थेतच आहे.

**१४.** उपरोक्त वार्तापत्रावरून असे स्पष्टपणे दिसून येते की, उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी व काही गुणवंत प्राध्यापक यांनी मिळून दिशाभूल करणाऱ्या भ्रममूलक 'पुड्या' वृत्तपत्रातून वार्ता म्हणून सोडण्यास सुरुवात केली आहे. यापुढेही अशा वार्ता अधून-मधून येत राहतील. उच्च शिक्षणमंत्र्यांनी याबाबतची स्थिती नीट समजून घेतली पाहिजे.

(१) मा. सर्वोच्च न्यायालयाने १८ नोव्हेंबर २०१३ रोजी "सहा वर्षे सेवा झालेल्या प्रत्येक नेट-सेट मुक्त शिक्षकाला आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात यावेत" असे अंतरिम आदेश पारित केले.

(२) मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा अंतरिम आदेश होण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सात खंडपीठांनी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेले होते. त्यातील कोणताही निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला नाही. उलट त्या सातही निर्णयांना सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे संरक्षण प्राप्त झाले आहे.

(३) सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर आधारित ३१ निर्णय या शिक्षकांच्या बाजूने दिले. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्णयांची संख्या ३८ झाली.

(४) दिनांक २५ मार्च २०१५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने ही सर्व प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयाकडे सुनावणीसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेत असतांना १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा आपला अंतरिम आदेश सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. इतकेच नव्हेतर अशा अंतरिम आदेशामुळे अनेक अधिव्याख्यात्यांना यापूर्वी लाभ मिळालेले आहेत. तत्सम लाभ न मिळाल्यामुळे विपरितरीत्या प्रभावित झालेल्या तत्सम शिक्षकांना मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर जाऊन अंतरिम आदेश मिळविण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाने मोकळा करून दिला. त्याप्रमाणे २५ मार्च २०१५ नंतर निरनिराळ्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी आठ निर्णय दिलेत. अशारितीने या शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठांच्या निर्णयांची संख्या ४६ झाली. या ४६ पैकी एकही निर्णय सर्वोच्च न्यायालयामध्ये रद्दबादल झालेला नाही. मात्र त्या ४६ निर्णयांना सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे संरक्षण मिळालेले आहे.

(५) मा. मुंबई उच्च न्यायालयाचा दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजीचा निर्णय हा एकमेव निर्णय असा आहे की, तो या शिक्षकांच्या विरोधात गेलेला आहे. मात्र त्या निर्णयाचा अर्थ **"आमचा २७ जून २०१३ रोजीचा शासननिर्णय या खंडपीठाने 'अपहेल्ड' केलेला आहे"** अशी जी माहिती उच्च शिक्षण विभागातील अधिकारी उच्च शिक्षणमंत्र्यांना देत आहेत, ती भ्रममूलक आहे, हे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. याचे कारण हा एकमेव निर्णय हा अजिवंत निर्णय आहे. याचा अर्थ असा आहे की, निर्णय झाल्याच्या क्षणापासून त्या निर्णयानेच त्या निर्णयाची अंमलबजावणी स्थगित केलेली आहे व ही स्थगिती फक्त सर्वोच्च न्यायालयच उठवू शकेल असेही नमूद केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आजतागायत ती स्थगिती उठवलेली नाही.

(६) मा. सर्वोच्च न्यायालयाने आपला १८ नोव्हेंबर २०१३ रोजीचा अंतरिम आदेश आजपावेतो दुरूस्त केला नाही, मागे घेतलेला नाही किंवा रद्द केलेला नाही.

**१५.** उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी व काही गुणवंत प्राध्यापक याबाबतीत अगदी सुरूवातीपासून वेगवेगळे भ्रम पसरविण्याचे काम करीत आहेत. या गुणवंत प्राध्यापकांचे त्यांचे म्हणून काही प्रश्न आहेत, त्या प्रश्नातून मार्ग काढणे हा वेगळा विषय आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या घडामोडीविषयी भ्रामक माहिती पसरविणे ही वेगळी गोष्ट आहे. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी आता या प्रश्नात लक्ष घातलेले आहे. उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार हा थेट सहसंचालकांना देऊन ठेवण्यात आलेला आहे व अनेक ठिकाणी सहसंचालकांनी हा अधिकार वापरलेला आहे. याची तपशीलवार माहिती मी २५ परिच्छेदांचे एक तपशीलवार टिप्पण मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना दिनांक ९ मार्च २०२० रोजी पाठवून दिलेली आहे. **उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सहसंचालकांच्या पदाला जेवढा अधिकार आहे, तेवढाही अधिकार राज्याच्या उच्च शिक्षणमंत्र्यांना नाही ही अधिकाऱ्यांची मांडणी उच्च शिक्षणमंत्र्यांनी ठामपणे फेटाळून लावली पाहिजे,** असे नमूद करण्यात येत आहे.

**१६.** सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाची अंमलबजावणी करण्याचा हा जो प्रयत्न मा. उच्च शिक्षणमंत्री करीत आहे त्याला सर्वांनी मनापासून पाठिंबा दिला पाहिजे, हे नमूद करणे आवश्यक आहे. अचानकच उच्च शिक्षणमंत्र्यांच्या स्तरावर या प्रश्नाचा ऊहापोह सुरू झाल्यामुळे या सर्व शिक्षकांच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात उंचावलेल्या असून संपूर्णपणे कायदेशीर स्थिती त्यांच्या बाजूला असतांना उच्च शिक्षणमंत्र्यांनी हा प्रयत्न मध्येच सोडून दिला तर त्यामुळे उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये अतिशय तीव्र असंतोष निर्माण होईल, हेही नमूद करणे आवश्यक वाटते. विभागातील अधिकाऱ्यांचे पूर्वग्रह मोडीत काढून मा. सर्वोच्च न्यायालयाचा भरभक्कम आधार असलेल्या प्रकरणात लक्ष घालून तो प्रश्न सोडविण्यात यश मिळविल्यास उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्यांच्या पदाला न्याय दिला असे समजल्या जाईल, हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, हा प्रश्न मध्येच सोडून देऊन उच्च शिक्षणमंत्र्यांनी माघार घेतली तर फार मोठी नामुष्की त्याच्या पदरी पडेल.

**१७.** "पुढील दोन महिन्यांत शिक्षक आणि पदवीधरांसाठी राखीव जागांच्या तीन मतदारसंघातील निवडणुका येऊ घातल्या आहेत. या निवडणुकीसाठी हा आटापिटा असल्याचीही चर्चा आहे." ही जी पुडी लोकसत्तेच्या वार्ताहरांमार्फत गुणवंतांनी सोडलेली आहे ती खरी नसून उच्च शिक्षणमंत्र्यांनी अवमान याचिकेच्या भारातून उच्च शिक्षण विभागाला मुक्त करण्यासाठी तळमळीने प्रयत्न केला आहे, हे दाखवून देण्याची जबाबदारी सुद्धा मा. उच्च शिक्षणमंत्र्यांचीच आहे.

***** ***** *****

**१९.** नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढलेल्या दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयात परिच्छेद १५ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद नमूद आहे :- **"अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन**

***उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी संचालक व सहसंचालकांचे हे प्रयत्न रद्दबादल ठरविल्यानंतर त्यातील एकाही प्रकरणात पुन्हा रिकव्हरी काढण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही किंवा अधिकाऱ्यांना त्यांच्या अशा प्रयत्नात यश मिळाले नाही.***

*(लेखाचा परिच्छेद ८ पहा)*

**औरंगाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या ज्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम आदेश पारित केले होते, त्या याचिकेतील शिक्षकांना मात्र पदोन्नतीचे लाभ औरंगाबादच्या सहसंचालकांनी लागू केले नव्हते. या शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयात पुन्हा दाद मागावी लागली. तेव्हा हे लाभ मिळाले.**

*(लेखाचा परिच्छेद ७ पहा)*

**राहून** त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**" त्यातील अटीविषयी कोणताही वाद नाही किंवा कोणाचा काहीही आक्षेप नाही. मात्र नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत २७ जून २०१३ रोजीच्या शासननिर्णयामध्ये "**त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ गृहित धरण्यास शासन मान्यता देत आहे**" या वाक्याचा अर्थ काय होतो? याबाबत खरा वाद होता. त्यापायी अनेक शिक्षकांना न्यायालयात जावे लागले व त्याबाबतीत मा. उच्च न्यायालयाचे सर्वच्या सर्व निर्णय या शिक्षकांच्या बाजूने लागले. हा मूळ शासननिर्णय मराठीत असला तरी त्याचे इंग्रजी भाषांतर शासनाने उच्च न्यायालयात दाखल केले असून त्यातील परिच्छेद १५ पुढीलप्रमाणे:-

"15. **The Government hereby grants approval to hold the services of those non-Net/Set teachers, appointed during the period from the date 23.10.1992 to 3.4.2000,** who during their service period, have not acquired the educational qualification / eligibility (Net/Set/Ph.D./M.Phil.) prescribed for the post of lecturer, by the University Grant Commission, **valid for all purposes, from the date of issuance of said Government Resolution,** subject to following conditions."

२०. मा. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणी (W.P.No. 13166/ 2017) दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी दिलेल्या पहिल्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उधृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.:-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission." *(P120NB2018)*

२१. या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

२२. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा आणखी एक निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये दिला असे दिसून येते. *(P25NB2019)* या निर्णयामध्ये मा.खंडपीठाने दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा.मुंबई खंडपीठाने पहिल्या निर्णयान्वये निश्चित करून दिलेला आहे असे स्पष्ट शब्दात नमूद केलेले आहे ते पुढीलप्रमाणे :-

**"Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018."**

पहिल्या निर्णयात मा.मुंबई खंडपीठाने काय निश्चित केलेले आहे? हेही या निर्णयात मा.खंडपीठाने नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

**"It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.** Appointment of the husband of the petitioner appears to have been approved even exemption has been granted by the University Grants Commission."

२३. महासंघाच्या व घटक संघटनांच्या स्तरावर याबाबतीत शासनाच्या विरोधात गेलेल्या नऊ निर्णयांच्या प्रती उपलब्ध असल्यामुळे या याचिकांची संख्या संघटनेच्या स्तरावरून नऊच सांगितली जाते. हे नऊ निर्णय *(P104NB20)* पुढीलप्रमाणे :-

**(1) W.P.No. 13166 of 2017 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **03rd October, 2018.**

**(2) W. P. No.1219 of 2017 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **19th October, 2018.**

**(3) W. P. No. 1304 of 2016 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment : **12th December, 2018.**

**(4) W. P. No. 755 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay. Date of Judgment : **9th April 2019**

**(5) W. P. No. 3293 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment :**18/06/ 2019**

**"It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by Government of Maharashtra providing for eligibility tests by UGC or tests accredited by UGC"**

- *(Judgement dated 17th October 2013.)* *(लेखाचा परिच्छेद ३ पहा)*

**(6) W. P. No. 2068 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Nagpur. Date of Judgment : **29th July 2019.**

**(7) W. P. No. 11316 of 2015 :** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad. Date of Judgment : **28th August 2019.**

**(8) W. P. No.7375 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **9th July, 2020**

**(9) Writ Petition No.7395 of 2019 :** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur. Date of Judgment : **9th July, 2020.**

**२४.** शासकीय आकडेवारी प्रमाणे अशा याचिकांची संख्या १५ आहे असे दिसून येते. सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाने दाखल केलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे तीन विशेष अनुमती याचिका फेटाळल्या गेल्या. त्यांचे तपशील *(P104NB20)* पुढीलप्रमाणे:-

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019.**

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020.**

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020.**

**२५.** राज्यशासनाच्या तीन विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात फेटाळल्यानंतरही "मा.उच्च न्यायालयामध्ये सदर प्रलंबित याचिकांपैकी १५ याचिकांमध्ये शासनाच्या ध्येय धोरणाच्या विरोधात निकाल पारित करण्यात आलेले आहेत. **त्या निकालांच्या विरोधात 'Review' आणि 'SLP' दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून त्यापैकी तीन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावलेल्या आहेत,**" अशी भूमिका उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घेतलेली आहे.

उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी एक सुडबुद्धीचे व बेकायदेशीर धोरण स्वीकारलेले आहे, असे स्पष्टपणे दिसून येते. प्रत्येक नेट-सेट मुक्त शिक्षकाचे निवृत्तीवेतनाचे प्रकरण शासनाकडे आल्यावर "**२७ जून २०१३ च्या शासननिर्णयानुसार तुम्हाला जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू होत नाही,**" असे त्या शिक्षकाला कळविण्यात येते. त्यानंतर शिक्षकाला उच्च न्यायालयामध्ये जाण्याशिवाय गत्यंतर राहत नाही. उच्च न्यायालयाचा निर्णय शिक्षकांच्या बाजूने झाल्यानंतरसुद्धा सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली जाते. विशेष अनुमती याचिका फेटाळली गेल्यानंतरसुद्धा अवमान याचिका दाखल झाल्याशिवाय पेन्शन प्रकरण निकाली काढले जात नाही. अवमान याचिकेमध्ये एखाद-दुसरी सुनावणी झाल्यानंतर प्रकरण बरेच गळ्याशी आलेले आहे, असे पाहून मगच **त्या एकट्या शिक्षकाच्या बाबतीत एक स्वतंत्रपणे आदेश काढून त्या एकट्या शिक्षकाला जुनी पेन्शन योजना लागू केली जाते. धोरणात्मक शासननिर्णय मात्र निर्गमित केल्या जात नाही.**

**२६.** प्रत्येक प्रकरणात नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे नमूद करणारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी आतापावेतो नऊ निर्णय दिलेले आहेत. **पहिल्या प्रकरणात मा. खंडपीठाने दिलेला अर्थ प्रमाणभूत मानून पुढच्या आठही प्रकरणात मा.खंडपीठांनी आपले निर्णय दिलेले आहेत. तसे त्या प्रत्येक निर्णयात नमूद आहे. तीन प्रकरणातील धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेले असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकारी वारंवार प्रत्येक शिक्षकाला उच्च न्यायालयात का पाठवितात व उच्च न्यायालयात निर्णय झाल्यानंतर कधी कधी मधूनच सर्वोच्च न्यायालयात काही बाबतीत विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा खेळखंडोबा का करतात?**

**२७.** या शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असे निर्णय मा.उच्च न्यायालयाने ९ याचिकामध्ये दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात ते निर्णय कायम करण्यात आल्यानंतर त्याची इमानेइतबारे अंमलबजावणी करणे हे राज्यकर्त्यांचे घटनात्मक कर्तव्य आहे. घटनात्मक तरतुदींचे आपण पालन करू अशी शपथ घेतल्यानंतरच मा. उच्च शिक्षणमंत्री त्यांच्या खुर्चीवर बसलेले आहेत. याची वेगळी आठवण करून देण्याची गरज पडू नये असे अपेक्षित आहे.

*****

***पहिल्या प्रकरणात मा. खंडपीठाने दिलेला अर्थ प्रमाणभूत मानून पुढच्या आठही प्रकरणात मा.खंडपीठांनी आपले निर्णय दिलेले आहेत. तसे त्या प्रत्येक निर्णयात नमूद आहे. तीन प्रकरणातील धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेले असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकारी वारंवार प्रत्येक शिक्षकाला उच्च न्यायालयात का पाठवितात व उच्च न्यायालयात निर्णय झाल्यानंतर कधी कधी मधूनच सर्वोच्च न्यायालयात काही बाबतीत विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा खेळखंडोबा का करतात?***

*(लेखाचा परिच्छेद २६ पहा)*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 25.09.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.10.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................